आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१३ डिसेंबर २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रयागराजमध्ये महाकुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ७ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं भूमिपूजन आणि लोकार्पण

- राज्यसभेत अध्यक्ष जगदीप धनखड यांच्यावरच्या अविश्वास ठरावाच्या मुद्द्यावरून झालेल्या गदारोळामुळे आजही कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- संसदेवरच्या दहशतवादी हल्ल्याला आज २३ वर्षं पूर्ण, शहिदांना देशभरातून आदरांजली

**आणि**

- स्मार्ट इंडिया हॅकेथॉनमध्ये राज्यातल्या चार संस्थांमधल्या विद्यार्थ्यांची बक्षिसांची कमाई

**<><><><><>**

प्रयागराजच्या भूमीवर एक इतिहास रचला जात असून महाकुंभ मेळ्याच्या आयोजनामुळे देशाची सांस्कृतिक आणि आध्यात्मिक ओळख एका नव्या उंचीवर पोहोचेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे.

प्रयागराजमध्ये पुढच्या वर्षी होणार असलेल्या महाकुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ७ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं भूमिपूजन आज त्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

भारत हा तीर्थक्षेत्रांचा आणि पवित्र नद्यांचा देश आहे. या नद्यांचं माहात्म्य, त्यांचा संगम म्हणजे प्रयाग आहे. प्रयोगराजचं वर्णन वेदांमध्ये केलं आहे, पावलोपावली पुण्यक्षेत्रं असलेलं हे एक आध्यात्मिक अनुभव क्षेत्र आहे, असंही मोदी यावेळी म्हणाले. तत्पूर्वी  प्रधानमंत्र्यांनी आपल्या दौऱ्याची सुरुवात गंगा, यमुना आणि सरस्वती नद्यांच्या संगमावर विधीवत पूजा करून आणि दर्शन घेऊन  केली.

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पायाभरणी झालेल्या प्रकल्पांमध्ये १० नवीन पूल, उड्डाणपूल, कायमस्वरूपी घाट आणि नदीसमोरच्या रस्त्यांचं  बांधकाम या विकासकामांचा समावेश आहे. प्रयागराज आणि आजूबाजूच्या परिसरातला प्रवास यामुळे सुलभ होईल. प्रक्रिया न केलेलं  सांडपाणी गंगेत वाहून जाण्यापासून रोखण्याच्या उद्देशानं एका प्रकल्पाचं लोकार्पणही त्यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

राज्यसभेत आजही अध्यक्ष जगदीप धनखड यांच्यावरच्या अविश्वास ठरावाच्या मुद्द्यावरून विरोधकांनी प्रचंड गदारोळ केला. काँग्रेसप्रणित विरोधी पक्षांनी हा अविश्वास ठराव आणला असून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये यावरून आजही खडाजंगी झाली. गेल्या तीस वर्षात आणि

आपल्या कार्यकाळात राज्यसभेच्या अध्यक्षांच्याविरोधात अशा किती नोटीस आल्या आहेत ते सभागृहासमोर यावं असं धनखड म्हणाले. विरोधी सदस्यांच्या वर्तनावर आणि त्यानी सभागृहाबाहेर केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यावर त्यांनी नाराजी व्यक्त केली. विरोधकांना त्यांच्याविरोधात प्रस्ताव आणण्याचा अधिकार आहे मात्र त्यांनी संविधानाचं उल्लंघन केलं आहे असं ते म्हणाले. विरोधकांचा ठराव १४ दिवसांनी घेतला जाईल, विरोधक वेळोवेळी घटनात्मक कामकाजाला टाळून अध्यक्षांच्या विरोधात मोहीम राबवत आहेत, अशी टीका त्यांनी केली. आपण नेहमीच विरोधकांप्रती आदरभावना दाखवली आहे, विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी आपल्याशी चर्चा करावी, असं त्यांनी सांगितलं. मात्र तरीही गोंधळ सुरूच राहिल्यानं सभागृहाचं कामकाज सोमवार सकाळपर्यंत स्थगित करण्यात आलं.

**<><><><><>**

देशाचं संविधान भारतीय नागरिकांनी तयार केलं असून ते भारताच्या मूल्यांवर आधारित आहे, असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी आज लोकसभेत सांगितलं. देशानं राज्यघटना स्वीकारली त्या घटनेला ७५ वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्त लोकसभेत आजपासून विशेष चर्चा सुरु झाली. या चर्चेला सुरुवात करताना संरक्षण मंत्री बोलत होते.

**<><><><><>**

संसदेवरच्या दहशतवादी हल्ल्याला आज २३ वर्ष पूर्ण होत आहेत. १३ डिसेंबर २००१ रोजी पाकिस्तानातून आलेल्या पाच दहशतवाद्यांनी संसद भवन परिसरात घुसून गोळीबार केला होता. संसदेचं रक्षण करताना वीरमरण आलेले सुरक्षा रक्षक आणि प्राण गमावलेल्यांना आज देशभरातून आदरांजली अर्पण करण्यात येत आहे. यानिमित्त संसद भवनात आज उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, केंद्रीय मंत्रिमंडळातले मंत्री, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी पुष्पांजली अर्पण केली. यावेळी हल्ल्यात शहिद झालेल्यांचे कुटुंबीय देखील उपस्थित होते.

संसद हल्ल्यातल्या शहिदांना आज संसदेच्या दोन्ही सभागृहात आदरांजली वाहण्यात आली. दोन्ही सदनात मौन पाळून शहिदांना अभिवादन करण्यात आलं.

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिन सोहळ्याचा एक भाग म्हणून १० ते १३ डिसेंबर दरम्यान संरक्षण मंत्रालयानं माय गव्हर्नमेंट प्लॅटफॉर्म वर एक प्रश्न मंजुषा आयोजित केली आहे. Quiz on Cultural Heritage and Traditions of India या नावानं माय गव्हर्नमेंट प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन घेतल्या जाणार असलेल्या प्रश्नमंजुषेबाबतचा तपशील www.mygov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**<><><><><>**

स्वामी विवेकानंद जयंती अर्थात युवा दिनाचं औचित्य साधून महाराष्ट्र प्रदेश भाजप येत्या १२ जानेवारीला अहिल्यानगर जिल्ह्यातल्या शिर्डी इथं प्रदेश अधिवेशन भरवणार आहे. या अधिवेशनाला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा उपस्थित राहणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. स्वामी विवेकानंदांच्या प्रगल्भ विचारांवर आधारित असणाऱ्या या अधिवेशनाच्या माध्यमातून तरुणांना भाजपकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यासाठी राज्यातले भाजपाचे १० हजारांहून अधिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

नवव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनची सातवी फेरी ११ ते १५ डिसेंबरपर्यंत देशभरातील ५१ केंद्रांवर एकाच वेळी सुरू आहे. त्यातील स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२४ च्या सॉफ्टवेअर एडिशनचा आज समारोप होत आहे. स्मार्ट इंडिया हॅकेथॉन हा उपक्रम विद्यार्थी तसेच व्यावसायिकांना तंत्रज्ञान आणि डिजिटल साधनांद्वारे वास्तविक-जगातील समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय विकसित करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित केला जातो.

स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२४च्या सॉफ्टवेअर एडिशनची अंतिम फेरी काल रात्री उशिरा विविध केंद्रांवर पार पडली. देशातल्या विविध राज्यांतील संघांनी कन्व्हर्सेशनल इमेज रेकग्निशन चॅटबॉट', 'महिला सुरक्षा', 'मायक्रो डॉपलर आधारित लक्ष्य वर्गीकरण', 'ट्रॅफिक व्यवस्थापनासाठी एआय आधारित उपाय', 'लाइव्ह लोकेशन ट्रॅकिंग आणि टूडी ब्लूप्रिंटचे थ्रीडी मॉडेलमध्ये रूपांतर' या समस्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला. यात काही केंद्रांच्या विद्यार्थ्यांनी बक्षिसांची कमाई केली आहे. त्यात मुंबईच्या वेलिंगकर इन्स्टिटट्यूट ऑफ मॅनेजमेंट, नागपूरच्या यशवंतराव चव्हाण इंजिनिअरिंग, नवी मुंबईतील दत्ता मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि संभाजीनगर इथल्या एमजीएम जेएनईसी या संस्थांचा समावेश आहे. तर मुंबईच्या वेलिंगकर इन्स्टिटट्यूट ऑफ मॅनेजमेंट इथे झालेल्या हॅकेथॉनमध्ये देशभरातील ३४ संघ सहभागी झाले होते. या वेळी या संघांनी गृह मंत्रालय, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग आणि भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड यासह विविध मंत्रालये आणि सरकारी विभागांनी दिलेल्या ६ समस्यांवर काम केले.

**<><><><><>**

पुष्पा २ या चित्रपटाच्या खेळादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी हैदराबाद पोलिसांनी आज तेलुगु अभिनेचा अल्लू अर्जुन याला अटक केली आहे. ४ डिसेंबर रोजी हैदराबाद इथल्या एका चित्रपटगृहात पुष्पा -२ या चित्रपटाच्या प्रिमिअर खेळा दरम्यान चेंगराचेंगरी सदृष स्थिती निर्माण झाली

होती. या खेळाच्या वेळी उपस्थित असलेल्या अल्लू अर्जुनची एक झलक पाहण्यासाठी त्याच्या चाहत्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. ती अनियंत्रित झाल्याने एकच गोंधळ उडाला. या खेळादरम्यान चित्रपटाची टीम उपस्थित राहणार असल्याची पूर्व सूचना पोलिसांना देण्यात आली नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये आज सुरक्षादलांबरोबर झालेल्या चकमकीत दोन माओवादी ठार झाले. बिजापूर जिल्ह्यातल्या बासुगुडा भागात केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या कोब्रा बटालियन आणि जिल्हा राखीव दलाने संयुक्त शोध मोहीम राबवली होती. या मोहिमेदरम्यान नेंद्रा जंगलात चकमक झाली. चकमकीनंतर सुरक्षा दलाने मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठी जप्त केला.

**//<><><><><>//**